1.

जनतेच्या देणग्यामधून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी निधी उभारणे.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय क्र. ग्रापापु-१०९६/सीआर-१२०८/पापु-०७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक : २८ नोव्हेंबर, १९९६.

प्रस्तावना :

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या योजनांसाठी केंद्र-शासन तसेच राज्य शासनाकडून दरवर्षी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. त्याचप्रमाणे काही प्रमाणात बाह्य सहाय्यित प्रकल्पांच्या स्वरुपात जागतिक बँक, ब्रिटीश शासन यांच्याकडूनही निधी प्राप्त होत असतो. परंतु, पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने राज्यातील समस्याग्रस्त गावांच्या संख्येचा विचार करता तसेच कृषि व औद्योगिक कारणामुळे पाण्याचा होणारा उपसा, अनियमित पर्जन्यमानामुळे दिवसेंदिवस खाली जाणारी भूगर्भातील पाण्याची पातळी इ. कारणामुळे समस्याग्रस्त गावांच्या संख्येत होणारी वाढ लक्षात घेता पाणी पुरवठा कामाच्या व्याप्तीच्या तुलनेत वरील प्रमाणे प्राप्त होणारा निधी अपुरा पडतो. शासनाची आर्थिक साधने सिमित असल्यामुळे गरज असून सुध्दा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी राज्य किंवा केंद्र शासनाकडून आवश्यकते प्रमाणे निधी उपलब्ध होण्यास मर्यादा पडतात. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात शासनाने प्रकाशित केलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये देखिल या मुद्द्याचा उहापोह करण्यात आलेला आहे. ही बाब लक्षात घेता सदर कार्यक्रमांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा यासाठी जनतेचा सहभाग घेवून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी निधी उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय : प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी लक्षात घेवून जनतेच्या देणग्यामधून ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी निधी उभारण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे योजना विहित करण्यात येत आहे.

योजनेचा तपशिल खालील प्रमाणे राहील :-

[१] योजनेचे नांव : सदर योजनेस "ग्रामीण पेयजल योजना" असे संबोधण्यात यावे.

[२] योजनेचे स्वरुप : ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांसाठी जनतेचा सहभाग या योजनेअंतर्गत खालील २ स्वरुपात देणग्या प्राप्त करुन घेण्यात याव्या.

अ] ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक साहित्य/वस्तु यांच्या

५१

ब] देणगी निधीच्या स्वरूपात.

२. देणगीदाराकडून प्राप्त आवश्यक साहित्य/वस्तु व निधीचा विनियोग :

अ] ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत देणगीदाराकडून मिळालेल्या वस्तु/साहित्याचा विनियोग :

वस्तु स्वरूपात देणगीदाराकडून ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी आवश्यक साहित्य किंवा देखभालीसाठी वाहने इ. स्वीकारण्याची जिल्हा परिषदांना या योजनेअंतर्गत मुभा असेल. वस्तुचा/साहित्याचा वापर देणगीदाराने निर्देशित केले असल्यास त्या भागातच करण्यात यावा. मात्र असा भाग निर्देशित केला नसल्यास त्याचा वापर जिल्हा परिषद जिल्हयात कोठेही करु शकेल. तसेच संबंधित साहित्य देणगीदाराकडून प्राप्त झालेले आहे, याची व्यापक प्रसिध्दी करण्यात यावी. त्याच प्रमाणे देणगीदाराने देवू केलेले साहित्य ज्या योजनेवर किंवा ज्या भागात वापरण्यात येत असेल तेथे देणगीदारांच्या नांवाची पाटी लावण्यात यावी. वाहने देणगीच्या स्वरूपात मिळाल्यास वाहनावर देणगीदाराचे नांव खालील प्रमाणे नोंदविण्यात यावे.

"ग्रामीण पेयजल योजनेंतर्गतच्या/या गावासाठी जिल्हा परिषदेला ------ यांच्या सौजन्याने प्राप्त वाहन".

देणगीदाराकडून मिळालेल्या साहित्याची नोंद जिल्हा परिषदेच्या योग्य त्या लेख्यात करण्यात यावी.

ब] ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकांकडून निधीच्या स्वरूपात देणगी प्राप्त झाल्यास तिचा विनियोग खालील सूचनांना अधिन राहून करण्यात यावा.

१] प्रत्येक जिल्हा परिषद स्तरावर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लोकसंस्थेकडून मिळणाऱ्या देणगी स्वरूपाचा निधी जमा करण्यासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १३१ [१] अन्वये प्रत्येक जिल्हा परिषद स्तरावर "लोक सहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा निधी" स्थापन करण्याबाबतचे निर्देश सर्व जिल्हा परिषदांना देण्यात येत आहेत. अशा प्रकारे स्थापन करण्यात आलेल्या निधीत देणगी स्वरूपात मिळणारा निधी जमा करण्यात यावा.

२] "लोकसहाय्यित ग्रामीण पाणी पुरवठा निधी"त लोकसंस्थेकडून देणगीच्या स्वरूपात मिळणाऱ्या रक्कमा जिल्हा परिषदेच्या सर्वसामान्य पावती पुस्तकावर पोच देवून जमा करण्यात याव्यात.

...3/-

३] जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करण्यात यावी. समितीचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सचिव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी असावेत. या समितीत प्रस्तावित योजना अंमलबजावणी यंत्रणेच्या प्रमुखाला सभासद म्हणून घ्यावे. समितीची ही जबाबदारी राहील की, प्राप्त होणा-या देणग्यांच्या प्रस्तावावर या शासन निर्णयाला अनुसरुन कार्यवाही होईल व त्वरित योजनेची अंमलजावणी होईल. प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत समितीची बैठक व्हावी.

४] हा निधी प्राप्त झाल्यानंतर लगेचच प्रथम जिल्हा निधीत जमा करण्यात यावा.

५] या निधीचे बँक खाते मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांच्या नावे असावेत.

६] या निधीचे लेखे स्वतंत्र ठेवण्यात यावेत.

७] या योजनेच्या नोंदी स्वतंत्र नोंद र वहीत ठेवण्यात याव्यात.

८] या निधीतील रक्कम ताबडतोब खर्च होणार नसेल अशी रक्कम आवश्यकतेनुसार अल्पकाळ/दिर्घकाळ मुदतीने बँकेत ठेवावी आणि त्यावर मिळणारे व्याज त्याच योजनेवर खर्च करण्यात यावे.

३. सदर निधीतील रक्कम फक्त ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांवर खाली नमूद केलेल्या पध्दतीनुसार खर्च करण्यात यावी.

अ] संबंधित देणगीदाराने विनिर्दिष्ट केलेल्या गावे/वाडयांत जिल्हा परिषद, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या संस्थेपैकी योग्य त्या संस्थेमार्फत उपयुक्त अशा पाणी पुरवठयाच्या योजना देणगीदारांच्या रक्कमेतून घेण्यात याव्यात.

ब] देणगी दारांची संमती असल्यास देणगीची रक्कम देणगीदाराने विनिर्दिष्ट केलेल्या गावे व वाडयात अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन देखभाल व दुरूस्तीवर खर्च करण्यात यावी.

४. देणगीदारांच्या देणगीतून नळ पाणी पुरवठा योजना घेताना ती शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे व निकषाप्रमाणे असावी. नळ/पाणी पुरवठा योजनेची किंमत रूपये १०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळामार्फत करण्यात यावी. मात्र यासाठी लागणारा निधी जिल्हा परिषदेने "लोकसहाय्यित ग्रामीण पाणी पुरवठा निधी" तून संबंधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागास द्यावा. अशा रू. १०.०० लाखापेक्षा जास्त किंमती असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांना तांत्रिक मंजुरी देण्याची व त्याचे तांत्रिक पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची राहील.

...४/-

नळ योजनेची अंदाजित किंमत रु. १०.०० लाखा पेक्षा कमी असल्यास योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात यावी अशा प्रकारच्या योजनांना तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदांची राहील.

५. विंधण विहिरींची कामे घ्यावयाची असल्यास ती प्रचलित पध्दतीनुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून करण्यात यावी यासाठी आवश्यक तो निधी जिल्हा परिषदेने "लोक सहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा निधी"तून वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांना उपलब्ध करून द्यावा. मात्र देणगीदाराने विशिष्ट ठिकाणाचा उल्लेख केला असल्यास तेथे प्रचलित पध्दत शिथिल करण्यात यावी.

६. देणगीदाराच्या देणगीमधून साध्या विहिरींची कामे घ्यावयाची असल्यास सदर कामे प्रचलित कार्यपध्दतीनुसार जिल्हा परिषदेमार्फत करण्यात यावी. साध्या विहिरींच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी देण्याची प्रक्रिया योजनेअंतर्गत तरतुदीतून घ्यावयाच्या कामासारखीच राहील.

काही देणगीदारांनी रोख रक्कमेऐवजी विंधण विहिरी, साध्या विहिरी अथवा नळ पाणी पुरवठा योजना स्वत: करून देण्याची इच्छा व्यक्त केल्यास संबंधित ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या संमतीने योजना राबविता येतील. याशिवाय काही देणगीदारांनी एखाद्या गावाच्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी स्वखर्चाने घेण्यास पुढाकार घेतल्यास अशी योजना देखभाल व दुरुस्तीसाठी संबंधित गावच्या ग्राम पंचायतीच्या पुर्वानुमतीने घेण्यास अनुमती देता येईल. अशाप्रकारे पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी शक्यतो कायमस्वरुपी किंवा कमितकमी ५ ते १० वर्षे असावी.

७. "लोक सहाय्यित ग्रामीण पाणी पुरवठा निधी"तून खर्च करण्यासाठी व योजनेच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देणे व निविदा स्वीकारण्याचे अधिकार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ वा महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १२५ व १२६ अन्वये देण्यात आलेल्या सर्वसामान्य वित्तीय अधिकाराप्रमाणे राहतील.

८. देणगीदारांच्या रक्कमेतून वरीलप्रमाणे योजना राबवितांना ज्या योजना देणगीदारांच्या सहाय्यातून उभारण्यात येतील त्यांना व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर देणगीदारांचा स्थानिक प्रतिष्ठित लोक प्रतिनिधींमार्फत सत्कार करण्यात यावा. असा सत्कार समारंभ वर्षातून

......५/-

एकदा आयोजित करून त्यात सर्व देणगीदारांचा सन्मान करावा व देणगीदारांना प्रमाणपत्र देण्यात यावे. ज्या देणगीदारांनी १ लाखापेक्षा जास्त देणगी दिली असेल त्यांना स्मृती चिन्ह [medal] देण्यात यावे.

* ज्या देणगीदारांनी रु. १०.०० लाखापेक्षा जास्त देणगी दिलेली आहे, त्यांना स्मृती चिन्ह देण्यात यावे व त्यांना "भगीरथ भूषण" अशी उपाधी देण्यात यावी. ज्या देणगीदारांनी २५ लाखापेक्षा जास्त देणगी दिली असेल त्यांचा राज्य पातळीवर सन्मान करण्यात यावा.

९. देणगीदारांच्या रक्कमेतून घेण्यात आलेल्या योजनेच्या ठिकाणी खालील प्रमाणे नोंद असलेला व तयार करण्यात आलेला फलक लावण्यात यावा. "ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत श्री./श्रीमती ______________________________ यांच्याकडून प्राप्त झालेल्या रुपये ______________ च्या देणगीतून राबविण्यात आलेली योजना".

१०. वरीलप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर आस्थापित करण्यात येणाऱ्या "लोकसहाय्यित ग्रामीण पाणी पुरवठा योजना निधी" ची लेखा तपासणी स्थानिक लेखा परिक्षकाकडून करून घेण्यात यावी.

११. जिल्हा परिषदेच्या स्तरावर देणगीदारांची यादी विहित नमुन्यात ठेवण्यात यावी व त्यात देणगी विषयींचा संपूर्ण तपशिल ठेवण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ रु. न. देशमुख ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१] मा. राज्यपालांचे सचिव,
२] मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
३] मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४] सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५] सर्व विभागीय आयुक्त,
६] सर्व जिल्हाधिकारी,
७] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
८] संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, स्वारगेट, पुणे.

....६/-

०९.] सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, एक्सप्रेस टॉवर, चौथा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

१०] मुख्य अभियंता [ग्रामीण] महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, १७५, डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

११] परिसर अभियांत्रिकी मंडळाचे सर्व अधीक्षक अभियंता.

१२] सर्व विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.

१३] परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभागाचे सर्व कार्यकारी अभियंता.

१४] सर्व जिल्हा परिषदांच्या लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता.

१५]. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.

१६] महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई.

१७] महालेखपाल, महाराष्ट्र - ०२, नागपूर

१८] सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९] वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०] नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१] ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व [illegible]/उप सचिव.

२३] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

२४] निवड नस्ती, कार्यासन पापु-०७, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

[भोसले/१४११९६.५८]

६४

## नमूना

### ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी देणगी देणाऱ्या देणगीदारांची यादी.

| अ. न. | देणगीदारांचे नाव व पत्ता | देणगी दिलेल्या योजनेचे नाव | दिलेल्या देणगीचे स्वरूप | | देणगीचे आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | रोख रक्कम | योजनेच्या कामाच्या स्वरूपात | |
| | | | | | |